■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६७ ■ रविवार दि.१५ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 267 ■ Sunday Dt.15 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# महापुराने बीड शहर पाण्यात डबडबणार?

## २३ जुलै १९८९ सारखी बीडमध्ये महापुराची दुर्घटना घडली तर नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन जबाबदार?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# पालकमंत्र्याला गोड बोलून स्वत:ची पोळी भाजून घेण्यात विद्यमान आमदार माहीर!

## अजितदादांच्या आभाराचे बॅनर बिंदुसराला मोकळा श्वास घेण्यासाठी सार्थकी लागेल का?

## आमदार संदीप भैय्या सामान्य लोक बिंदूसरात वाहून गेल्यावर जाग येणार का?
## नुसतं जलपूजन करून जमतं नसतं प्रत्यक्षात अतिक्रमण हटाव मोहीम राबवा?

बीड । प्रतिनिधी

यावर्षी मान्सुनपुर्व झालेल्या अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण पुर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे. येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असुन दि.२३ जुलै १९८९ सारखा बिंदुसरा नदीला महापुर येऊन ३५ वर्षांपूर्वी घडलेली दुर्दैवी घटना घडु शकते. नदीकाठच्या वस्तिंना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली होती. गेल्या ३ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, युनुस शेख, सुदाम तांदळे यांनी वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा याला छुपा पाठिंबा असुन नदीपात्रात कच–यांचे ढीग, भर घालुन त्यावर प्लाटींग करणे, रस्ते बनविणे, बांधकाम करणे असे सर्रास प्रकार आढळून आले.

संबंधित प्रकरणात विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केल्यानंतर त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद डॉ.निलम पाटील यांनी दि.२९ मे आणि दि.२८ जुन २०२३ अशा २ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड निता अंधारे यांना बिंदुसरा नदीपात्रात भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम प्रकरणी ठोस कारवाई करण्याचे आदेश देऊनही मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी आणि जिल्हा प्रशासनाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे भविष्यात जर बिंदुसरा नदीला आलेल्या पुरामुळे जिवितहानी अथवा वित्तहानी झाली तर याला सर्वस्वी नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जबाबदार असणार आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात फौजदारी कारवाई आणि नुकसान भरपाई जबाबदार अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी केली आहे.





■ भूमाफियाना सत्तेतल्या आमदाराचे बळ गोरगरिबाच्या छत्रछायाची काढतात ते कळ; अतिक्रमणाकडे बघा जरा?

■ गेल्यावर्षीच अनेक दुकाना व्यापाऱ्यांच्या डोळ्यात देखत वाहून गेल्या; नदीपात्रात कचऱ्यांचे ढीग पाहून प्रदर्शन दाखवल्यासारखे वाटते?

■ विभागीय आयुक्तांनी २ वेळा मुख्याधिकारी यांना बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमण प्रकरणी ठोस कारवाईचे आदेश देऊनही जाणिवपूर्वक दुर्लक्ष?

### पुराचा धोका ओळखून उपाययोजना करण्यापेक्षा भुमाफियांची तळी उचलण्यात नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाने धन्यता मानली : डॉ.गणेश ढवळे



१९८९ चा बिंदुसरा नदीला आलेला पुराचा मागील अनुभव पाहता नगरपरिषद प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभाग यांना वारंवार पुर नियंत्रण रेषा (निल रेषा, लाल रेषा) आखणी करण्यात यावी. संरक्षक भिंतीचा अभाव, नदीपात्रात व शेजारी अनेक अतिक्रमित ईमारतीची बांधकामे करण्यात आलेली आहेत. तर फुलाई नगर मधील बिंदुसरा नदीपात्रात सिमेंटची भिंत बांधून नदीचा प्रवाह वळविण्यात आलेला आहे आणि संबंधित प्रकरणात वारंवार तक्रारी व आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद व जिल्हा प्रशासन आपापले स्वार्थ साधून भुमाफियांशी संधान बांधून आहेत त्यामुळे आज बीडकरांचा जीव टांगणीला लागलेला असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

## राक्षस भुवन येथे स्थानिक गुन्हेची अवैध वाळू उपसावर कारवाई



बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा. बीड यांनी अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करण्यासाठी अवैध धंद्ये करणारांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत.

त्यावरुन दिनांक १५/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे चकलांबा हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, ईसम नामे अक्षय पोटफडे व करण पोटफेडे हे ट्रॅक्टर, लोडर व ट्रॉली च्या सहाय्याने राक्षस भुवन नदी पात्र मधून अवैधरित्या वाळू उपसा करत आहेत. यावरुन सदर ठिकाणी दोन पंचाना पाचारण करुन पोलीस स्टाफसह पोलीस उपनिरीक्षक विघ्ने यांचे टीम ने राक्षस भुवन नदी पात्र येथे अचानक छापा टाकला असता ईसमनामे अक्षय पोटफडे व करण पोटफेडे हे लोडर चे सहाय्याने अवैध रित्या कोणताही परवाना नसताना वाळू उपसा करत असताना मिळून आले. त्याचे

पान २ वर

## बेकायदेशीररित्या पिस्तूल बाळगणाऱ्या दोन इसमांना शिवाजीनगर पोलीसांनी केले जेरबंद



बीड । प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील गोंविंदनगर धानोरा रोड, बीड या ठिकाणी होंन्डा शाईन मो.सा. क्र. चक१४ क– १६०८ यावर दोन इसम असुन त्यापैकी एका इसमाचे कंबरेला पिस्टल लावुन ते फिरत असल्याचे गोपनीय माहिती शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार यांना मिळालेने सदर बातमीचे अनुषंगाने खात्री करुन कारवाईकामी तात्काळ पोलीस ठाणे स्थरावर पथक तयार

पान २ वर



# अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचा प्रश्न मार्गी लावणार : धनंजय मुंडे

## माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीला आश्वासन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीची रास्त मागणी सभागृहात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद होई पर्यंत पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले.



माजीमंत्री धनंजय मुंडे हे काल दि. १३ जून रोजी बीड शहरात आले असता बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी त्यांची भेट घेऊन विना अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली.


यावेळी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या व्यथा वेदना याची मला जाणीव आहे. कित्येक दिवसापासून नव्हे तर वर्षापासून बिना पगारी काम करताना काय वेदना असतात. त्यांच्या घरची परिस्थिती कशी असते, याची मला चांगली जाणीव आहे त्यामुळे आपल्या सर्व मागण्या रास्त असून या रास्त मागण्या विधिमंडळात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहे. जोपर्यंत टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद होत नाही. तोपर्यंत पाठपुरावा सुरू ठेऊन तुमचा प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या पाठोपाठ माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.

# आरोग्य विभागातील कारभारावर संताप!

## वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलांमध्ये अनियमितता; पदोन्नती प्रक्रियेला प्रशासनाचा दुटप्पी दृष्टिकोन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात गेल्या काही वर्षांपासून सुरु असलेल्या अनियमित कारभारावर आता कर्मचाऱ्यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली आहे. वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलांमधील विलंब व अनियमित मंजूरी प्रक्रिया आणि तब्बल ३-४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पदोन्नतीच्या फाईली यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.



कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, गेल्या २-३ वर्षांपासून वैद्यकीय प्रतिपूर्ती (चशवळलरश्र ठशळालीीशा-ाशपीं) संबंधी अनेक फाईल्स प्रलंबित असून, जे पैसे देतात, त्यांच्याच फाईल्स मंजूर केल्या जातात, असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. २६ एप्रिल २०२४ रोजी मंजूर झालेल्या फाईल सोडून, थेट ७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या नंतरच्या फाईल्सना मंजुरी देण्यात आली. यामध्ये पारदर्शकतेचा पूर्ण अभाव असून, आर्थिक व्यवहार झाल्याशिवाय बिल मंजूर होत नाही, अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये रुजली आहे.

यासोबतच, विभागातील पदोन्नती प्रक्रियाही गेल्या ३-४ वर्षांपासून थांबलेली आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी सेवा पात्रता पूर्ण करूनही त्यांना वरिष्ठ पदांसाठी संधी मिळालेली नाही. यासंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करूनही वरिष्ठ व आस्थापना अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतलेली नाही, ही बाब कर्मचाऱ्यांच्या मनोबलावर घाला घालणारी ठरत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, आरोग्य विभागातील या गंभीर व प्रलंबित बाबींवर तातडीने लक्ष देण्यात यावे. अन्यथा, कर्मचाऱ्यांना आपल्या हक्कांसाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा स्पष्ट इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर,उपजिल्हाप्रमुख शिवसेना वैधकीय मदत कक्ष बीड व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, शाखा बीड यांच्या वतीने प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची आणि सर्व प्रलंबित बाबींवर योग्य तो निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष एम. एम. वाघमारे यांनी सांगितले की, जर प्रशासनाने योग्य प्रतिसाद दिला नाही, तर आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही.

# महामानव अभिवादन ग्रुपच्या मोफत शिकवणी वर्गातील गुणवंताचा गौरव

बीड । प्रतिनिधी

महामानव अभिवादन ग्रुप बीड शहरात व परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. महामानव अभिवादन ग्रुप चे दानदाते प्रा. डॉ. नामदेव शिनगारे व त्यांची मुलगी आनंदी शिनगारे यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतना निमित्त; महामानव अभिवादन ग्रुप संचलित प्रकाश आंबेडकर नगर येथील मोफत शिकवणी वर्गातील वैष्णवी चौगुले, आकांक्षा वाघमारे, अमृत चौगुले, नायरा कुराडे,प्रीतम रोकडे,अनन्या वाघमारे, राजरत्न विद्यागर, समृद्धी बचुटे, श्रद्धा रोकडे, तंजीला शेख या ११ गुणवंत विद्यार्थ्यांना एक वर्ष पुरेल एवढ्या शैक्षणिक साहित्याची किट व पुष्पगुछ मान्यवरांच्या हस्ते देऊन सत्कार करण्यात आला तर ५८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते वही पेनचे वाटप करण्यात आले,



कार्यक्रमाचे अध्यक्षपदी ड के. आर. गाडे हे होते तर विचारमंचा वर महामानव अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जि. एम.भोले, वाचाल तर वाचाल फिरते माफत वाचनालायचे संस्थापक डी. जी. वानखेडे, से. नी. जिल्हा प्रबंधक एलआयसी वाघमारे यु.एस,समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, बसपा जिल्हाध्यक्ष प्रशांत वासनिक, ड तेजस वडमारे, एस. एस. सोनावणे,बी. डी. तांगडे, काशिनाथ वाघमारे, व प्राध्यापक डॉ. नामदेव शिनगारे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. एम.राऊत यांनी केले तर प्रास्ताविक प्रशांत वासनिक यांनी करून उपस्थित विद्यार्थ्यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती देऊन त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन अभ्यास करावा असे आवाहन केले. प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनीही सामाजिक व शैक्षणिक विचार व्यक्त करून अनिष्ठरूढी व अंधश्रद्धेच्या आहारी न जाता वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल ठेवावी हे अनेक उदाहरणाद्वारे अत्यंत सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना लहानपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून सुरू करण्यात आलेल्या वाचाल तर वाचाल या फिरत्या मोफत वाचनालयाचे पहिले केंद्र असलेले प्रकाश आंबेडकर नगर केंद्राकरिता ४५ पुस्तकांचा संच वितरित करण्याकरिता मान्यवरांच्या हस्ते शिकवणी वर्गाच्या शिक्षिका विशाखा वाघमारे यांना सुपूर्त केला. वितरित केलेल्या पुस्तकावर आधारित १५ ऑगस्ट पूर्वी विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन स्वातंत्र्यदिनी प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास प्राध्यापक डॉ.नामदेव शिंगारे यांच्यातर्फे १००० रुपये बक्षीस तर दुसरा क्रमांक मिळवणाऱ्या ५०० रुपये बक्षीस वाचाल तर वाचाल तर्फे, तर तिसरा क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास आयु. यु एस वाघमारे तर्फे ४०० रुपये बक्षीस तसे पाच विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस प्रशांत वासनिक यांनी जाहीर केले तरी या पुस्तकाचा जास्तीत जास्त वाचनाचा फायदा घ्यावा असे आवाहन डी.जी. वानखेडे यांनी केले.

# उच्चशिक्षितांचेही लक्ष आता कारंजा टॉवरकडे

## येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का : एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर कडे आता उच्चशिक्षितांचेही लक्ष जाऊ लागले आहे. नुकतेच येथे एका अभियंत्याचा वाढदिवस येथे साजरा करण्यात आला. येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का असा प्रश्न या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी उपस्थित केला आहे.

सन २०१४ सालापासून ऐतिहासिक कारंजा टॉवर ची दुर्दशा दूर करण्यात यावी याकरिता शासन-प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याकरिता वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. प्रसिद्धी माध्यमातून लेख आणि बातम्या सुद्धा प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. तरीही जिल्हा प्रशासन असो की बीड नगर परिषद प्रशासन दोघांकडूनही ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी गेल्या अकरा वर्षात एकही काम करण्यात आलेले नाही. या ऐतिहासिक इमारतीच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक असलेली १४ कामे करण्याची यादी जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांना देण्यात आलेली आहे. त्यापैकी ०३ कामे कारंजा परिसरातील मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग यांनी पुढाकार घेत इतरांना सोबत घेऊन केली आहेत. बाकीची ११ कामे अजूनही प्रतीक्षेतच आहेत. म्हणून वेळोवेळी याकडे दोन्ही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. तरीही जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषद प्रशासन इकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. मात्र आता समाजातील उच्चशिक्षित लोकांचे लक्ष कारंजा टॉवर कडे जात असून ते टॉवर समोर येऊन आपले वाढदिवस साजरे करू लागले आहेत.

अशाच प्रकारे नुकतेच येथे सचिन ठोंबरे या अभियंत्यांचा वाढदिवस दिगंबर माळगे, नवनाथ तपासे, बाबा पंडित, शिवाजी सुस्कर, अंकुश आगळे, गोविंद धांडे, अमोल कुमकर, नितीन धांडे, शंकरराव जगताप, डॉ. विक्रम सिंह कपूर, मुकुंद भालेकर, मधुकर धांडे, ऐतिहासिक कारंजा टॉवर साठी संघर्षरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, गणेश तपासे, मन्यारवाडी चे सरपंच भिकू शिंदे, शेख लालू यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यामुळे ऐतिहासिक कारंजा टॉवर चा सन्मान करत येथे साजरे करण्यात येणारे वाढदिवस या ऐतिहासिक वास्तूची दूर्दशा दूर करणार का असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

पान १ वरून...

### राक्षस भुवन येथे स्थानिक गुन्हेची

ताब्यातून २ ट्रॅक्टर, लोडर, ट्रॉली व दीड ब्रास वाळू असा १७,०६००० रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीस पोलीस स्टेशन चकलांबा येथे हजर करुन त्याचे विरुध्द पोउपनि महेश विघ्ने स्थागुशा, बीड यांनी सरकार तर्फे फिर्याद देवुन गु.र.नं २१३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३ (५) भा.न्या. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदरची कामगिरी नवनित काँवत पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा. बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, स.फो, जयभाये, पोह राजु पठाण, महेश जोगदंड, राहुल शिंदे, पो अं बप्पासाहेब घोडके, चालक सुनील राठोड यांनी मिळुन केलेली आहे.

### बेकायदेशीररित्या पिस्तूल बाळगणाऱ्या

करुन रवाना केले होते. नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे गोंविद नगर येथील सिमेंट रोडवर व महाराणा प्रताप चौकाचे दरम्यान सापळा रचुन थांबलेले असतांना मो.सा.क्र. चक१४ क- १६०८ यावर दोन इसम येतांना दिसले. त्यावेळी नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता सदर इसमांनी सदरची मो.सा. चालु स्थितीत सोडुन ते करपरा नदीकडे पळु लागले. त्यावेळी नमुद पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचा दोन ते तीन किलो मिटर नदीतुन पाठलाग करुन कसोशीचे प्रयत्न करुन त्यांना पकडले. त्यावेळी सदर इसमांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव १) सुयोग उर्फ छोट्या मच्छिंद्र प्रधान वय २५ वर्षे रा. विवेकानंद शाळेजवळ, गोंविदनगर धानोरा रोड, बीड २) स्वप्नील उर्फ आदित्य उर्फ सोपनदार अशोक पाखरे वय ३० वर्षे रा. भिंगार ता.जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी नमुद दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अंगझडतीत इसम नामे सुयोग उर्फ छोट्या मच्छिंद्र प्रधान यांची अंगझतीत एक गावठी बनावट लोखंडी पिस्टल ज्यास मॅग्जीन नसलेला जु.वा. किं. ४०,०००/- रु. असा मिळुन आल्याने सदरचा गावठी पिस्टल व गुन्ह्यात वापरलेली मो.सा. चक१४ क- १६०८ ही जप्त करण्यात आली.

यातील आरोपी क्र.१ सुयोग उर्फ छोट्या मच्छिंद्र प्रधान यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०६ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. २ स्वप्नील उर्फ आदित्य उर्फ सोपनदार अशोक पाखरे याचे विरुध्द आहिल्यानगर जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल असुन सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे चोरी, जबरी चोरी, घरफोडी व अवैध शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि दुनगहु, सपोनि क्षिरसागर, पोहवा आघाव, पोना/४७० मराडे, पोशि/४८७ येवले, पोशि/२०७७ रहाडे, पोशि/९०४ महानोर, पोशि आगलावे, पोशि सानप, पोशि कांदे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/दुनगहु हे करत आहेत.

# जि.प.कर्मचाऱ्यांनी जाहीर निषेध नोंदवून निर्णयाची केली होळी



बीड । प्रतिनिधी

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय लिपिक संवर्ग वेतन त्रूटी व जुनी पेन्शन संघटनेचे राज्य अध्यक्ष अशोक डहाळे यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद बीडच्या सभागृहात जिल्हास्तरीय बैठकीत मुकेश खुल्लर समितीने दिलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करुन सर्व संघटनांनी लिपीक वर्गीय संवर्गातील कर्मचा-यावर व लेखा संवर्गातील कर्मचा-यावर चौथ्या आयोगापासून वेतनावर झालेल्या अन्यायाबाबत लिपिक वर्गीय संघटना व म.रा.जि.प.लेखा कर्मचारी संघटना आणी म.रा.जि.प.युनियन यांनी मागणी केलेली असतानाही खुल्लर समितीने संघटनेच्या मागणीला विचारात न घेता लिपीक वर्गीय व लेखा संवर्गातील कर्मचा-या विरुध्द अहवाल देवून वेतन त्रूटीमध्ये तफावत निर्माण करुन अवमान केलेला आहे.

दि.२.६.२५ ला शासनाकडून निर्णय निर्गमित केल्यामुळे जि.प.कर्मचा-यात असंतोष निर्माण झालेला आहे.याकरिता जिल्हा परिषद अंतर्गत सर्व राज्य स्तरीय संघटना एकत्रित येवून कृतीसमिती करुन दि.२२.६.२५ नंतर लेखणी बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे.आज दि.१३.६.२५ रोजी संघटनेच्या बैठकीनंतर जि.प.बीडच्या आवारात जि.प.समोर संघटनेच्या पदाधिका-यांनी व कर्मचा-यानी दि २.६.२५ च्या शासन निर्णयाची होळी करुन निषेध नोंदविला व याबाबत शासनास निवेदन देण्याचे ठरले.तसेच बैठक संपल्यानंतर अहमदाबादहून लंडनला जाणा-या विमानाचा अपघात झाल्यामुळे मरण पावलेल्या सर्व नागरिकांसाठी दोन मिनट स्तब्ध उभा राहून त्यांचे आतम्यास शांती लाभावी करिता श्रदांजली वाहण्यात आली.

लिपीक वर्गीय संघटनेच्या बैठकीस उपस्थित राज्य अध्यक्ष अशोक डहाळे, म. रा. जि. प. सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष शेख वजीर, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष बळीराम उबाळे, म.रा. जि.प. युनियनचे अनंत खेडकर, सहाय्यक प्रशासन अधिकारी प्रवीण येवले,महादेव सोनवळकर ,वरिष्ठ सहाय्यक लेखा गोरे, संजय डावकर, विनायक आणेराव, जाधव, राहूल जोशी, राहूल गुंजेगावकर,लक्ष्मीकांत देशपांडे,गणेश खाडे,खदीर काद्री,कैलास तांगडे, कृष्णा मुंडे,सौंदर्य,दिलीप फुलेवाड, विलास मुंडे, शिवाजी राठोड, किशोर जाधव,चंद्रकांत सरवदे, डि.जी.जाधव,विवेक फुंदे,श्रीराम सानप, विनोद कांडेकर,विनोद साळवे,संतोष सिरसट,मकरध्वज सावंत, पडोळे, अयोध्या तांदुळ, किस्कींदा डोईफोडे, सुरेखा विभुते,माजी मॅडम,देवगुडे मॅडम,अंबिका साळुंके,माया गायकवाड,सुनीता गर्जे,कावळे मॅडम, मोटेगांवकर मॅडम, माधवी पुरी, स्मिता मुदीराज, ईतर सर्व विभागातील कर्मचा-यानी बैठकीत सहभाग नोंदवून बैठक उत्साहात संपन्न झाली.

# खंडाळ्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले पेरणीचे प्रात्यक्षिक : जायभाय यांच्या शेतात केली सोयाबीनची पेरणी

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली आस्थेवाईकपणे चौकशी : गावकरी भारावले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सध्या पावसाचे चांगले वातावरण आहे. खरीप हंगामाच्या तोंडावरती चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची पेरण्याची लगबग सुरु झालेली आहे. मे महिन्यामध्ये पाऊस पडल्याने व सध्याही पाऊस चालूच असल्याने काही ठिकाणी वाफसा स्थिती नाही, परंतु बऱ्याच ठिकाणी पेरण्या सुरु झालेल्या आहेत. या परिस्थितीत बीड जिल्ह्याचे लोकप्रिय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पेरणीची पद्धत कशी असते ही पाहण्याची इच्छा व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्यातील खंडाळा या गावची निवड केली. नियोजनानुसार बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके व त्यांची टीम तसेच सुभाष साळवे व त्यांची कृषी विभागाची टीम खंडाळा या गावात पोहोचली.



प्रारंभी सरपंच राजरतन जायभाय यांनी गावकऱ्यांतर्फे जिल्हाधिकारी यांचा छोटेखानी सत्कार केला. नंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सरळ शेतात गेले. बाबासाहेब जायभाय यांचे शेत निवडलेले होते. सध्या त्यांना सोयाबीन या पिकाची पेरणी करावयाची होती. महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करून निवड झालेल्या शेतकऱ्यांना प्रमाणीत बियाणे कृषी विभागाकडून मिळालेले आहे. सदर बियाणे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीने संशोधित केलेले - फूले किमया हे वाण आहे.

यापूर्वीच उप कृषि अधिकारी राजेंद्र राऊत, सहाय्यक कृषी अधिकारी संतोष काशीद, बी टी एम जुबेर पठाण व अशोक काळे यांनी सदरील सोयाबीन बियाण्याला कार्बनडिझीम व थायोमिथाक्झाम यांची बीज प्रक्रिया कशी करावी व नंतर पि एस बी व रायझोबियम यांची बीज प्रक्रीया कशी करावी हे शेतकऱ्यांना समजावून सांगितले होते.

जिल्हाधिकारी शेतात आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना काही प्रश्न विचारले - जसे की आपल्या भागातील मुख्य पीक कुठले आहे ? यावर शेतकऱ्यांनी सोयाबीन हेच मुख्य पीक असल्याचे सांगितले. त्यानंतर ओलिताच्या सिंचन सुविधांच्या वापराविषयी विचारले असता शेतकऱ्यांनी सांगितले की या ठिकाणी पाणी मुबलक आहे. परंतु ते देण्याची व्यवस्था पुरेशी नाही. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर शेतकऱ्यांना महावितरण विभागाच्या कुसुम योजने अंतर्गत सोलार पंप बसवण्याचा सल्ला दिला. यानंतरही जर शेतकऱ्यांच्या काही अडचणी असतील तर त्या माझ्याशी संपर्क साधा असे आवाहन केले. गावातील मुख्य व्यवसाय शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायाबद्दल विचारले असता सहायक कृषि अधिकारी संतोष काशीद यांनी दुग्ध व्यवसायासोबतच कांदा पीकावर शेतकऱ्यांचे उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे सांगितले.

शेतकरी बाबासाहेब जायभाय यांचे बैलजोडी व पेरणी यंत्र तयार होते. जिल्हाधिकारी यांनी स्वत: हातामध्ये बैलाचा कासरा घेऊन व दुसऱ्या हातामध्ये बियाणे घेऊन बैलचलीत पेरणी यंत्रावर स्वत: पेरणी चालू केली. नंतर ते जवळपास अर्धातास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह शेतामध्ये पेरणी करण्यात रंगले होते. यानंतर श्री सुभाष साळवे यांनी टोकन यंत्राचा वापर कशा पद्धतीने वाढला पाहिजे, कृषि विभाग कशा प्रकारे टोकन यंत्रास प्रोत्साहीत करत आहे. याविषयी जिल्हाधिकारी यांना माहिती देऊन गावकऱ्यांशी चर्चा केली व टोकण यंत्राचा प्रत्यक्ष वापर कसा करावा याचे एक प्रात्यक्षिक घेण्याची जिल्हाधिकारी यांना विनंती केली.

टोकन यंत्राविषयी व केलेल्या बीजप्रक्रिया विषयी उप कृषि अधिकारी राजेंद्र राऊत यांनी जिल्हाधिकारी यांना माहिती सांगितली. या टोकन यंत्रावर देखील स्वत: जिल्हाधिकारी यांनी पेरणी करून पाहिली. शेती करताना येणाऱ्या अडीअडचणी याविषयी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांसमवेत चर्चा करून समजावून घेतल्या. त्या सोडवण्याविषयी चर्चा देखील केली. पुढे बोलताना जिल्हाधिकारी म्हटले की सर्वांनी फार्मर आयडी काढणे आवश्यक आहे, जिवंत सातबारा मोहिमे अंतर्गत आवश्यक त्या दुरुस्त्या करून घ्याव्यात. तसेच महसूल विभागाची कोणतीही कामे असल्यास माझ्याशी अथवा संबंधित तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधावा असे आवाहन केले.

कृषी विभागातील वेगवेगळ्या योजना कशा पद्धतीने राबवल्या जात आहेत. याविषयी कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी माहिती दिली. यानंतर जिल्हाधिकारी यांनी गावातील प्रतिष्ठित शेतकरी व सरपंच यांनी केलेल्या तक्रारीनुसार चालत जाऊन गावातील विजेचे खांब व तारेची स्वत: पाहणी केली व यावर उपाययोजना करण्यासाठी ठोस पाऊल उचलण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी कृषी विभागाच्या वतीने बियाणे, खते यांचे योग्य नियोजन व्हावे व योग्य सल्ला गावागावात पोहोचावा अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हाधिकारी महोदयांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे गावकऱ्यांमध्ये नवचैतन्य पहावयास मिळाले.

याप्रसंगी बीड तालुक्याचे लोकप्रिय तहसीलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी शीतल चाटे, तलाठी रेश्मा तानगे, उप कृषि अधिकारी राजेंद्र राऊत, सहाय्यक कृषी अधिकारी संतोष काशीद, बी टी एम जुबेर पठाण, अशोक काळे, सरपंच राजरतन जायभाय, शेतकरी बाबासाहेब जायभाये, ग्रामपंचायत सदस्य किरण केकान, अशोक चौरे, सुदाम जायभाय, त्रिंबक केकान, भास्कर जायभाय, भीमराव चौरे, तुकाराम जायभाय, शिवाजी जायभाय, रजनीकांत केकान, अरुण चौरे, आबा केकान, रामा जायभाय, बाबुराव जायभाय, सुभाष जायभाय, आदिनाथ चौरे, ज्ञानेश्वर चौरे, महाधन जायभाय सुजित जायभाय, बयजी गीते, आश्रुबा जायभय, रंगनाथ जायभाय, सुभाष चौरे, सुरज चौरे, दिगंबर चौरे, विश्वंभर चौरे, फुलचंद जायभाय, जालिंदर जायभाय, भरत जायभाये, आप्पा पाटील चौरे व गावातील प्रतिष्ठित शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राला आली अवकळा

## छत गळती, शस्त्रक्रिया गृहात लाईट नाही, टॉयलेट ब्लॉकेज, दारे खिडक्या तुटक्या; जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना तक्रार

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे मुख्य बाजारपेठ असलेल्या पंचक्रोशीतील १५ वाड्यांतील गोरगरीबांना आरोग्य सेवा पुरवणाऱ्या ३७ वर्षे पूर्ण झालेल्या लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अवकळा आली असुन पावसाळ्यात मुख्य इमारतीतील छत खराब झाल्याने गळती लागली असुन रूग्णांची तारांबळ उडत आहे.



शस्त्रक्रिया गृहातील लाईट फिटींग नादुरुस्त आणि जीर्ण झालेली असुन नव्याने करण्याची आवश्यकता आहे. तसेच मुख्य इमारतीतील टायलेट ब्लॉकेज असुन रूग्णांची गैरसोय होत आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचा विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होत असुन सिंगल फेजची जोडणी करण्यात यावी यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासस्थानांची दुरावस्था झाली असून त्यांची दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी तसेच परिचर ५ मंजूर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन उर्वरित ३ रिक्त पदे भरण्यात यावीत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना केली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासस्थानांची दुरुस्ती आवश्यक : डॉ.गणेश ढवळे

प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना बांधण्यात आलेल्या निवासस्थानांची दुरावस्था झाली असुन पावसाळ्यात पाणी गळती होते. दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या आहेत.लाईट फिटींग ठिकठिकाणी उखडलेल्या अवस्थेत असुन नादुरुस्त आहे. टायलेट आउटलेट ब्लॉकेज असल्याने अधिकारी आणि कर्मचारी यांची गैरसोय होते. फरश्या तुटलेल्या अवस्थेत आहेत आणि निवासस्थानांची रंगरंगोटी करण्याची आवश्यकता आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५ मंजुर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन ३ परिचर पदे रिक्त असुन त्यामुळे मनुष्यबळावर मानसिक व शारीरिक ताण येत असुन रिक्त पदांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

**जिल्हा आरोग्य अधिकारी यांना केला पत्रव्यवहार**

लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि निवासस्थानी असणाऱ्या असुविधा जसे की पावसाळयात छताची गळती, शस्त्रक्रिया गृहात व ईतर ठिकाणी नादुरुस्त लाईट फिटींग, वारंवार खंडित विद्युत पुरवठा, टॉयलेट आउटलेट साठी सिमेंट टाकी नसल्यामुळे टॉयलेट ब्लॉक झालेला आहे. दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत असुन रंगरंगोटीची आवश्यकता असल्याचे पत्राद्वारे जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांना पत्रव्यवहार केल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी सांगितले.

– डॉ.रूपाली चिटकुलवार, वैद्यकीय अधिकारी,
प्रा.आ.केंद्र लिंबागणेश

# सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

चकलंबा । प्रतिनिधी



शिरूर कासार तालुक्यातील वरंगळवाडी येथील रावसाहेब भाऊसाहेब पवार यांची मुलगी गया हिचा विवाह पंधरा–सोळावर्षांपूर्वी अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या आनंदवाडी येथील रहवासी असलेले लालचंद आश्रुबा शेळके यांच्याशी झाला होता. विवाहनंतर काहीदिवसातच पती लालचंद शेळके, सासू संगीता शेळके व सासरा आश्रुबा शेळके यांच्या कडून सून गया हिस माहेराहून ट्रॅक्टर घेण्यासाठी ७ लाख रुपये घेऊन ये म्हणून सातत्याने जाच केला जात होता. याच कारणावरून घरामध्ये वाद होत होता. वडिलांकडची परिस्थिती हालखीची असल्यामुळे गया ट्रॅक्टर घेण्यासाठी पैसे आणू शकत नव्हती.


रोजच्या कटकटीला कंटाळून गयाने टोकाचे पाऊल उचलले. बुधवारी सकाळी शेतामध्ये काश्या (काडी कुडी) वेचण्यासाठी गेलेल्या गयाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र ही घटना लक्षात येताच तिला बीडकडे उपचारासाठी हलवले होते. बीड येथील खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेत असतांना उपचारा दरम्यान रात्री १० वाजण्याच्या सुमारास गयाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. गयाच्या मृत्यूची बातमी माहेरच्या नातलगाना समताच त्याच्या कडून मोठा संताप व्यक्त केला जात होता यामुळे अंत्यविधीच्या वेळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

सदरील घटनेची माहिती चकलंबा पोलिसांना मिळताच सपोनि. संदीप पाटील हेआपल्या फौज फाट्यासह घटनास्थळी जाऊन वाढत्या तणावाला मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच शोकाकुल वातावरणामध्ये अंत्यविधी पार पडला. मयत गयाचे वडील रावसाहेब भाऊसाहेब पवार यांच्या फिर्यादीवरून चकलांबा पोलिसामध्ये सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास आरोपी पती लालचंद शेळके, सासू संगीता शेळके, सासरा आश्रुबा शेळके यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पानपाटील हे करत आहेत. मयत गया शेळके हिच्या पश्चात एक चौदा वर्षाचा व एक सात वर्षाचा अशी दोन मुले आहेत. गयाच्या या आत्महतेची सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# सिरसाळ्यातील भोगवटा धारकांना मालकी हक्क भेटणार : कैलास कावरे

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मोजे सिरसाळा या ठिकाणी २० ते ४० वर्षापासून या ठिकाणी लोकांचे वास्तव आहे महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ भाई शिंदे साहेब सिरसाळातील भोगवटाधारकांचा प्रश्न मार्गे लावणार गेल्या अनेक दशकापासूनच्या मागणीचा सकारात्मक निर्णय घेऊन मालकी हक्क ची पीटीआर देणार सिरसाळ्यातील भोगवटाधारकांना अनेक योजनेपासून वंचित राहावे लागत असल्यामुळे गेल्या अनेक दशकांपासून च्या मागणीला लवकरच यश येणार असून यामुळे सिरसाळ्यातील भोगवटाधारकांना मालकी हक्क मिळून लवकरच दिलासा मिळणार आहे. आमचे नेते शिवसेनेचे युवा नेते शेख नसीब भाई यांच्या सातत्याने करत असलेला पाठपुराव्याला यश मिळणार आहे.



# शेत मजुराचा मृतदेह विहिरीत आढळला

आष्टी । प्रतिनिधी

दोन दिवसापासून घरातून बाहेर गेलेल्या सतीश हरिभाऊ सोनवणे या ४७ वर्षे शेतमजुराचा मृतदेह आष्टी तालुक्यातील शेरी परिसरात एका विहिरीत आढळला शनिवारी शेळ्या चढण्यास महिलांना एका विहिरीत मृतदेह असल्याचे दिसल्यानंतर ही घटना समोर आली. सपोनी विजय नरवाडे व पो.अ : मजरुद्दीन सय्यद, सव्वाशे, नवले यांनी पंचनामा केला. नंतर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले शेतमजुराच्या पश्चात आई, वडील पत्नी दोन मुले असा परिवार आहे.



महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा.ना. श्री.प्रतापजी सरनाईक यांचे बीड जिल्ह्यात आगमन आले असता युवासेनेच्या वतीने त्यांचे स्वागत करताना युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयामध्ये स्पर्धा परीक्षा ची तयारी करण्यासाठी, पुस्तकाची देवाण करताना स्पर्धक विद्यार्थी व ग्रंथालय कर्मचारी सौ. शीलाताई सुखदेव उजगरे वाचकांना प्रेरणा देताना घेतलेले छायाचित्र.

# राज ठाकरे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा; जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अन्नदान, केक आणि वृक्षारोपण

## देवाने आम्हाला तुमची सेवा करण्यासाठी निवडलं, हेच आमचं खरं भाग्य : वर्षा जगदाळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस यंदा खास पद्धतीने साजरा करण्यात आला. बीडमधील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राज्याच्या उपाध्यक्षा वर्षा जगदाळे यांच्या वतीने हा वाढदिवस अनाथ व बेघर नागरिकांसोबत साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात अन्नदान करण्यात आले आणि गरजू नागरिकांना भरपेट जेवण दिले गेले. यानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. राज ठाकरे यांच्या प्रतिमेसमोर केक कापून उपस्थितांमध्ये वाटप करण्यात आले आणि वाढदिवसाचा आनंद सर्वांसोबत सामायिक करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्षाताई जगदाळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रम राबवले. त्या या केंद्रातील बेघर, गरजू लोकांच्या मदतीस नेहमीच तत्पर असतात. वाढदिवसाच्या निमित्तानेही त्यांनी या परंपरेला पुढे नेत आपुलकीची भावना जोपासली.

या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये बीड जिल्हाध्यक्षा आशा कुटे, जिल्हा उपाध्यक्षा कल्पना कवठेकर, जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ बिडवे, बीड शहराध्यक्ष पठाण अमर जान, शास्त्री कुटे, अभिजीत वैद्य आणि काळजीवाहक छाया यांचा सहभाग होता. कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला आणि सामाजिक जाणिवेचा आदर्श घालून दिला.

# ओबीसी टार्गेट व ऑनलाईन घरकुल मंजूर यादी तात्काळ प्रसिद्ध करावी : आगलावे

बीड । प्रतिनिधी




बीड तालुक्यातील साञा– चांदणी ग्रुप ग्रामपंचायत ही अनेक कारणाने चर्चेत येत असुन ग्रामसेवकाच्या मनमानी कारभारामुळे नागरिक वैतागले असुन शासनाच्या विविध योजनाची माहीती देण्यास ग्रामसेवक हे टाळाटाळ करत आहेत शासन प्रत्येक बेघर नागरिकांना घरकुल देत असुन परतु येथिल ग्रामसेवक हे ओबीसी ट्रागेट किती आहे ओनलाईन किती नागरिकांचे घरकुल केले.

प्रतिक्षा यादी मधील किती लाभार्थी आहेत याबाबत कुठलीच माहीती देत नसुन हम करेसो कायदा या म्हणी प्रमाणे वागत असुन गोरगरीब बेघर लोकांना शासन घरकुल देत असताना ग्रामसेवक हे मर्जीतल्या लोकांना या घरकुल योजनेचा लाभ देत असल्याचे चिञ दिसुन येत असुन या ग्रामपंचायत मार्फत विविध योजना ह्या कागदोपञी राबविल्या असुन शालेय शिक्षण निधी तसेच रस्ते विकास निधी मध्ये देखील मोठा भ्रष्टाचार झाला आहे. साञा – चांदणी ग्रामपंचायत च्या ग्रामसेवकाचा मनमानी कारभार तात्काळ थांबवुन ओबीसी घरकुल योजनेचे ट्रागेट किती, ओनलाईन घरकुल मंजुर यादी तसेच प्रतिक्षा यादी तात्काळ जाहीर करावी अन्यथा साञा– चांदणी ग्रामपंचायतच्या विरोधात बीड पंचायत समिती समोर ञिव स्वरूपाचे आंदोलन करण्याचा ईशारा भारतीय विद्यार्थी सेनेचे मा. बीड जिल्हासचिव सचिन आगलावे यांनी दिला आहे.

# ज्ञानदीप बालसंस्कार शिबिरात वृक्षमित्रांची प्रेरणादायी भेट

धारूर । प्रतिनिधी

येथील ज्ञानदीप प्राथमिक शाळेत सुरू असलेल्या बालसंस्कार शिबिरामध्ये आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वृक्षमित्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुधाकर देशमुख यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षमितत्राचे विद्यालयातील शिक्षक शेख सर व सुरवसे यांनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन करण्यात आले. त्यानंतर वृक्षमित्रांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना वृक्षांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी मुलांना पर्यावरण रक्षणाचे संदेश देणारे गाणे सादर केले, जे विद्यार्थ्यांना अत्यंत आवडले. त्यांच्या सादरीकरणाने वातावरण आनंदमय झाले. वृक्षमित्रांनी वृक्षलागवडीचे महत्त्व, पाणी वाचवा, प्लास्टिक टाळा अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टी सहज आणि मनोरंजक पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या. विवीध प्राण्याचे आवाज काढून दाखवले विडीर्थ्याना बिया वाटप केल्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले आणि वृक्षमित्रांनी त्यांना सविस्तर उत्तरे दिली. विद्यालयातील शिक्षक श्री. यांनी वृक्षमित्रांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांनी निसर्गाशी मैत्री करावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संयोजन शिक्षक मंडळ व शिबिरप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.



जगभरातील नामांकित विद्यापीठापैकी एक असलेल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली, (जेएनयु) च्या न्यायालयीन समितीवर माझ्या नेत्या खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांची निवड झाल्याबद्दल मनपुर्वक अभिनंदन.

# भविष्यात गोरगरिबांच्या हातातली काठी म्हणून काम करण्याचा संकल्प : अजित गालफाडे



वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील केंडेपिप्री धानोरा या छोट्याश्या गावात राहून आपल्या समाजकार्याला सुरुवात करणाऱ्या वडवणी तालुका टायगर ग्रुपचे तालुकाध्यक्ष अजित गालफाडे यांनी आपला वाढदिवस विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला. टायगर ग्रुप राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ. तानाजी भाऊ जाधव, मराठवाडा अध्यक्ष पै.गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर, बीड जिल्हा अध्यक्ष मां.राकेश अण्णा जाधव व मा. नगरसेवक दत्तात्रय (आप्पा) जमाले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. वडवणी तालुक्यात टायगर ग्रुप ला प्रत्येक गाव खेड्यात एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात अजित गालफाडे यांचा मोलाचा वाटा आहे. टायगर ग्रुप आणि अजित गालफाडे हे जणू समीकरणच वडवणी तालुक्यात आपणास पाहावयास मिळत आहे त्यांनी आजपर्यंत आपले वाढदिवस हे गोरगरिबांच्या कल्याणासाठी उद्धारासाठीच समर्पित केलेले आहे आज त्यांनी आपला वाढदिवस हा वेगवेगळी कार्यक्रम राबवून साजरा करण्याचा संकल्प करून आपल्या कार्यकत्याना तसा सूचना संदेश देण्यात आला. यावेळी त्यांनी निवारा बालगृह मोहा फाटा समता भूमी जामखेड या ठिकाणी अन्नदानाचा कार्यक्रम, वडवणी पोलीस स्टेशन येथे वृक्षारोपण वडवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी रुग्णांना फळे वाटप केले. तालुक्यातील गाव खेड्यातील तांडा वस्तीवर गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम राबविला.

यावेळी अजित गालफाडे मित्र मंडळ व टायगर ग्रुप सदस्य, प्रदीप होके, वैभव राऊत, अजिंक्य घोलप, नवनाथ खंडागळे, अमोल चव्हाण, राकेश उजगरे, राजेश कसबे, अभिजीत पोटभरे, आकाश गालफाडे, ईश्वर गालफाडे, रंजीत गालफाडे, भोला लोंढे, सुनील खंडागळे, कृष्णा अक्षय भैय्या पांडू नांनवर, एकनाथ गणेश आकाश साई कदम, विशाल प्रवीण भागवत अशोक अजिंक्य केशव सचिन विशाल पांडुरंग गणेश गायकवाड आदींसह टायगर ग्रुप सदस्य उपस्थित होते.

मी केंडेपिप्री धानोरा यासारख्या छोट्या गावातून आपल्या समाज कार्यास सुरुवात केली आहे. गोरगरीब लोकांना माझ्यासारख्या छोट्याशा कार्यकर्त्यांच्या हातून काही तरी मदत मनून मी प्रत्येक वेळी माझा वाढदिवस गोरगरीब, वंचित, विद्यार्थी, अनाथ लोक व रुग्ण यांच्यासोबत साजरा करण्याचा संकल्प केला आहे आणि त्यामुळे या पुढे ही समाज उपयोगी व गोरगरीब जनतेसाठी कल्याणासाठी व उद्धारासाठीच मी काम करणार आहे.

# डीवायएफआयच्या तालुका अध्यक्षपदी जगन्नाथ पाटोळे तर सचिवपदी सचिन टिळक यांची निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) या युवक संघटनेचे तालुका अधिवेशन १३ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनास शहर व तालुक्यातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. या अधिवेशनात डीवायएफआयची नवीन तालुका कमिटी निवडली गेली. या नवीन तालुका कमिटीमध्ये डीवायएफआयच्या अध्यक्षपदी जगन्नाथ पाटोळे तर सचिवपदी सचिन टिळक यांची एकमताने



निवड करण्यात आली. या अधिवेशनात नवीन १४ सदस्यांची तालुका कमिटी एकमताने निवड करण्यात आली.

ही नवीन कमिटी डीवायएफआयचे जिल्हा उपाध्यक्ष सुहास चंदनशिव यांनी मांडली. व त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. देविदास जाधव यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सहसचिव म्हणून प्रशांत मस्के, आकाश कसबे तर कोषाध्यक्ष वैभव राजमाने यांची निवड करण्यात आली. आकाश सासणे, अनिल फुले, काझी साहब, राहुल भावठाणकर, बबलू सर्वदे, नरेश चव्हाण, रामदास घाडगे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. अधिवेशनाचे उद्घाटन डीवायएफआय संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख यांनी केले. तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड अजय बुरांडे यांनी नवीन तालुका कमिटीला सत्कार करून शुभेच्छा दिल्या. मागील कार्याचा आढावा प्रशांत मस्के यांनी मांडला. त्याचबरोबर येणाऱ्या काळामध्ये बेरोजगारी, जातीयवाद, धर्मांधता सह युवकांच्या समस्या बाबत सक्रिय होऊन आंदोलन उभे करण्याचे ठराव या अधिवेशनात घेण्यात आले.

# मुंडे साहेबांमुळेच प्रगती झाली...

## समृद्धी महामार्गावर हळवा क्षण; ना. पंकजा मुंडेंना आला भावनिक अनुभव!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी आयुष्यभर झगडणारे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती आजही जनमानसात किती खोलवर रुजलेल्या आहेत, याचा छोटासा पण अतिशय भावनिक करणारा अनुभव नुकताच पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला. समृद्धी महामार्गावर प्रवास करत असताना, बाजुच्या लेनमधून धावणाऱ्या दुसर्या एका गाडीतून अचानक एका महिलेनं हातात कागद घेत तो पंकजाताईंना दाखवण्याचा प्रयत्न केला. त्या कागदावर लिहिलं होतं – आम्ही मुंडे साहेबांमुळेच इंजिनिअर झालो... प्रगती झाली. Thank you!

हा प्रसंग पाहून क्षणभर पंकजाताईंनाही भावनिक आठवणींनी ओथंबून टाकलं. हा अनुभव केवळ भावनिक मेसेज मुंडे साहेबांसाठी होता. समृद्धी मार्गाच्या वेगासही तो क्षणभर थांबवून गेला, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पंकजाताईंनी या हृदयस्पर्शी प्रसंगाचा व्हिडीओ आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावर पोस्ट करत तो अनुभव शेअर केला आहे. या व्हिडीओमुळे अनेकांना गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याची आठवण झाली आणि अनेकांनी कमेंट्समधून आपल्या भावना व्यक्त केल्या. गोपीनाथराव मुंडे यांनी आयुष्यभर ग्रामीण, मागास, वंचित आणि शोषित घटकांच्या न्यायासाठी कार्य केलं. त्यांच्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची, तरुणांना रोजगाराची आणि गरजूंना मदतीची संधी मिळाली. त्यामुळेच आजही अनेक कुटुंबं त्यांना देव मानतात.



हा अनुभव केवळ भावनिक नसून, गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याचा जनमानसात किती दीर्घकालीन आणि खोलवर प्रभाव आहे, याचं जिवंत उदाहरण ठरला आहे. नेते आपल्यातून जातात, पण त्यांचं काम आणि त्यांची लोकांच्या हृदयामधील जागा कायम राहते. मुंडे साहेबांनी ही जागा आपल्या कार्यातून निर्माण केलेली आहे, हेच या प्रसंगातून पुन्हा एकदा सिद्ध झालं.

# अंगाला हळद; कपाळी बाशिंग वर पित्याला लाखोंचा चुना

## लग्न जमून देण्याच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढले

आष्टी । प्रतिनिधी

घरी शेतीवाडी बागायती राहायला पक्के घर मात्र वाढत चाललेली वय लग्नाला मुलगी मिळत नसल्याने अनेक कुटुंब बेचैन झाले आहेत. इकडे तिकडे तोंडातून लेकराचे हात पिवळे करण्यासाठी जीवाची तक्मक करणारा बाप मध्यस्तीच्या माध्यमातून लाखो रुपये देऊन लग्न जुळवतो पण हात पिवळे होताच नवरी पळून जात असल्याने उपवर मुलाचे अडचणी वाढल्याचे दिसत आहे.

आष्टी तालुक्यातील १७७ गावात मोठ्या प्रमाणावर तरुण अविवाहित आहेत. घरी शेतीवाडी राहण्यासाठी चांगली घर सोबत असतानाही केवळ नोकरी आणि वाढत चाललेली व यामुळे मुली देण्यासाठी पालक कानाडोळा करत आहेत. परिणामी लग्नासाठी मुली शोधताना आणि कुटुंबांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. यातच काही महिन्यापासून आर्थिक गंडा घालून खोटे लग्न लावून देणारे टोळी सक्रिय झाली आहे. यातून फसवणूक केल्याच्या घटना तालुक्यात ठीक ठिकाणी घडले आहेत. लग्नाळू नवरदेव आर्थिक गंडा घालून फसवले जातात. समजतात इज्जतीचा प्रश्न निर्माण होईल, या भीतीपोटी झाकली मूठ असे म्हणून अशा पश्चाताप करत बसण्याची वेळ व पित्यावर येत आहे.

### दोन वेळा लग्न, दोघी पसार

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत तीलच कारखेल येथील एका तरुणाची दोनदा लग्न लावली पण दोन्ही मुली पळून गेल्याने पावणे सहा लाखाची फसवणूक केल्याप्रमाणे ६ जून रोजी पाच जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



### रॅकेट सक्रिय

बनावट नातेवाईक लग्नासाठी नवरी घेऊन येतात तिचे अनेकदा लग्न लावून दिलेली असते पी नवरदेवाला दाखवली जाते मोजक्याच लोकात बैठक होऊन स्थळ पक्के करून लग्न लावायचे अर्धी व लग्न लावले नंतर अर्धी रक्कम हातात घेऊन रॅकेटमध्ये सहभागी वाटणी करून घेतात. आष्टी अंभोरा ठाणे हद्दीत घडलेली एकूण तीन घटना गाऊन आणायला गेले आणि गायब झाली असती. पोलीस ठाण्यातील एका ऑपोर मुलीचे लग्न होत नसल्याने त्याने पर जिल्ह्यात मध्ये स्थितीच्या माध्यमातून जुगाड लावले दोन लाख देऊन लग्न केले मात्र गावून आणायला जाते म्हणून गेलेली नववधू गायब झाली व तरुणाला दोन लाखाला गंडा घातला.

## मनुर येथील सर्वे क्र.२० येथे पैठण उजवा कालवा प्रकल्पाची चारी पुर्णपणे उद्ध्वस्त गुन्हे दाखल करुन कार्यवाही करा : शेख रशिद

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव –मनुर येथील सर्वे क्र.२० येथे शेती मध्ये प्लॉटिंगच्या नावावर पैठण उजवा कालवा प्रकल्पाची चारीची तोडफोड करुन उध्वस्त करण्यात आली आहे. ह्या संबंधित लोकांवर महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ परिच्छेद ५०, ५३ व ५४ अन्वये नुसार गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात यावे ह्यासाठी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी माजलगाव जलसंपदा विभागला निवेदन दिले आहे.



पैठण उजवा कालवा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत असतो. शेतकऱ्यांना हया चारी मुळे पाणी पुरवठा करण्यात मदत होते पण काही प्लॉटिंगवाल्यांनी पैठण उजवा कालवाची चारी पुर्णपणे उध्वस्त करण्यात आली आहे. पैठण उजवा कालवा लाभक्षेत्रातील वितरिका क्र.७४ मायनर क्र.एम आर १ साखळी क्र.३२८० मि.ते ३३७० मि. असे एकुण अंदाजे ८० मि ते ९५ मि. चारी पुर्णपणे उध्वस्त करण्यात आले आहे.महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ परिच्छेद ५०, ५३ व ५४ अन्वये नुसार गुन्हे दाखल करुन कार्यवाही करा नसता लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी शाखाधिकारी जलसंपदा विभाग माजलगाव यांना निवेदन देऊन इशारा दिला आहे.

# स्मशानभूमी जागेत अतिक्रमण : ग्रामपंचायत समोर रचले सरण!

## मृत्यू वटनवाडीत अंत्यसंस्कार जळगावात

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वटणवाडीतील ४५ वर्षे आजारी व्यक्तीचे शनिवारी सकाळी निधन झाले मात्र गावातील स्मानभूमीत अतिक्रमण केल्याने अंतिम संस्कार करायची कोठे हा प्रश्न उपस्थित झाल्याने संतापलेल्या आपल्या कुटुंबाने अंत्यविधीचे साहित्य ग्रामपंचायत समोर टाकल्यानंतर वातावरणाची चिघळले पण प्रशासनाने स्मशानभूमीचा प्रश्न सोडवण्याचा शब्द दिल्यानंतर एक किलोमीटर अंतरावरील जळगाव या ठिकाणी या दुसऱ्या गावातील स्मानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



बाळासाहेब बन्सी शिरोळे हे वाहक पदावर कार्यरत असताना काही वर्षांपूर्वी अपघात झाल्याने अपंगत्व आले होते त्यामुळे आतापर्यंत अंथरुणावर पडून शनिवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला पण स्मशानभूमीवर गेल्या अनेक वर्षांपासून एका व्यक्तीने अतिक्रम केल्याने अंत्यसंस्कारासाठी जागा शिल्लक नाही मग संतापलेल्या आपले कुटुंब आणि अंत्यसंस्कार साठी लागणारे साहित्य वटन वाडी ग्रामपंचायत समोर टाकल्याने काही कळ तणाव निर्माण झाला होता प्रशासनाने अतिक्रमण हटविण्यात येईल, असा शब्द दिल्याने एक किलोमीटर अंतरावर येथे दुपारच्या दरम्यान अंत्यसंस्कार संस्कार करण्यात आले.

## सिरसाळा ते मोहा रस्त्याचे काम तात्काळ चालू करा : शैलेंद्र पोटभरे

सिरसाळा । प्रतिनिधी

मोहा तालुका परळी हा रस्ता मंजूर झालेला असून या रस्त्यावरती अर्धवट साईट पट्ट्या करून काम थांबवले आहे. हा रस्ता शिरसाळा मोहा ते आंबेजोगाई अंतर जवळ असून या मार्गे अनेक प्रवासी जात आहेत. हा रोड तंडे वस्त्या वाड्या आशा २० ते २५ गावाला जोडलेला असून या रस्त्यावरती रहदारी अधिकची असून हा रस्ता अत्यंत बिकट झाला आहे.



रस्त्यावर खड्डे पडून उकारला असल्यामुळे खड्ड्यामध्ये पावसाचे पाणी साचत आहे आणि यामुळे अनेक एक्सीडेंट टू व्हीलर वरती झाले आहेत. फोर व्हीलर वरती झाले आहेत. मणक्याचे आजार अनेक प्रवाशांना झाले असून हा रस्ता तात्काळ शासनाने चालू करून मोहा सिरसाळा ते आंबेजोगाई प्रवाशांची सोय करण्यात यावी आणि अपघात होण्यासाठी टाळावा तात्काळ हा रस्ता चालू करण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी चे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी केली.

# माणुसकी जपत सामाजिक कार्यकर्त्यांकडून बेवारस मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कार

## नातेवाईकांनी नाकारले, परळीच्या नितीन शिंदेनी स्वीकारले

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बालाजी सोळंके नामक बेवारस व्यक्ती हा मागील २० वर्षापासून परळी शहरातील नेहरू चौक (तळ) परिसरात राहत होता.रस्त्याच्या बाजूला मयत झाल्याचे आज सकाळी दिसून आले. नितीन शिंदे यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात व पालिकेस कळवले. मयत सोळंके यांची परभणी शहरात वासत्वास असलेली रक्तातील नात्याची सखी बहीण असल्याची माहिती मिळाली पोलिसांनी त्यांच्याशी संपर्क केला असता भाऊ आणि माझा मागील २० वर्षापासून काहीही संबंध नाही आसे मयताच्या सख्या बहिणीकडुण निर्दयीपणे सांगीतले व त्यांच्या भावाचा अंत्यविधी करण्यास त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला. त्यामुळे निर्माण झालेला पेच प्रसंग पाहता सामाजीक बांधिलकी व मृत्यु पश्चात होणारी मानवी देहाची अवहेलना होऊनये या भावनेतुन



परळी शहरातील सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या नितीन शिंदे, सेवकराम जाधव, शिवाजी देशमुख यांनी घटणेचे गांभिर्य पाहता परळी शहरातील समाजकार्यात एक पाऊल पुढे असणाऱ्या व्यक्ती आणि पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने मयत बेवारस बालाजी सोळंके यांचा अंत्यसंस्कार करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यानुसार पोलीस प्रशासन, नगर पालिका प्रशासन आणि परळी शहरातील सामाजीक क्षेत्रातील मान्यवरांनी मिळून आज रोजी ५:३० वाजता परळीत सदरील बेवारस मयत व्यक्तीचा अंत्यविधी करण्याचा निर्णय घेतला. या वेळी कर्तव्यावर आसलेल्या चरणसिंग वळवी (बीट हवलदार) पोलीस हेड कॉन्स्टेबल परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या समक्ष व अधिकृत सहमतीने सामाजीक कार्यकर्ते नितीन शिंदे, सेवकराम जाधव सर, शिवाजी देशमुख, वेगवान मराठीचे उपसंपादक पत्रकार केशवराव मुंडे, आबासाहेब देशमुख, उत्तम मोरे यांच्यासह साजिद खान गुत्तेदार यांच्या दुकाना समोर रात्रीच्या वेळी सदरील मयत व्यक्ती आसऱ्याला झोपत आसे आणि त्यामुळे आपल्या दुकाणाचे संवक्षण होते याची जाण ठेऊण जाती धर्माचे बंधन तोडुण याप्रसंगी अंत्यविधी साठी लागणारे लाकडं (सरपन) दिले. तर बेकरी वाले माहेमूद खान, प्लम्बर नासिरभाई, अन्नू भाई व इतर बांधव देखील अंत्यविधीस उपस्थित होते.

या वेळी उपस्थित शिवाजीराव देशमुख आणि केशवराव मुंडे यांच्या कडुण मयत बालाजी सोळंके यांच्या पार्थिवास पुष्पहार अर्पण करुण श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रतिष्ठित व सामाजिक क्षेत्राची जाण व आवड असलेल्या मोजक्याच मान्यवरांच्या उपस्थित परळी वैजनाथ येथील वैकुंठ धाम स्मशान भुमित मयत बालाजी सोळंके यांच्यावर हिंदु रिती रिवाजा प्रमाणे विधी व अंत्यसंस्कार करण्यात आला.

# बीडमध्ये एन.के.कॉलनीत युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते विकासकामांचे उद्घाटन



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीड शहरातील पेठ बीड येथील एन.के.कॉलनीत रविवारी (दि.१५) स्थानिक निधीतून झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले. या कामांमध्ये ओपन स्पेसमधील उद्यान, कंपाऊंड भिंत, मंदिर परिसराची सुशोभीकरण अशी कामे समाविष्ट आहेत. यावेळी नागरिकांशी थेट संवाद साधताना डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले की, या भागाच्या विकासासाठी स्थानिक निधीतून कामे झाली असली तरी येणाऱ्या काळात शासनस्तरावर देखील पाठपुरावा करून अधिक निधी आणण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. या कार्यक्रमाला नगरसेवक प्रेम चांदणे, ॲड.विकास जोगदंड, रामसिंग टाक, अमर डागा, ओमप्रकाश तोतला, प्रकाश गायकवाड, शारदा डुलगज, रमेश गुरसाळी यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, डॉ.क्षीरसागर यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.




# जालन्यातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्मारकाला ना.पंकजाताई मुंडे यांची भेट

जालना । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या शहरात उभारण्यात येत असलेल्या स्मारकाला राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज भेट देऊन बांधकामाची पाहणी केली. स्मारकाला निधी देण्याची घोषणा करतानाच याचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी स्मारक समितीला दिली.

ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडल्यानंतर शहरातील अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येत असलेल्या २४ फुट उंचीच्या देशातील सर्वात उंच 'हिंदूधर्मरक्षिका महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाची पाहणी केली. हिंदू संस्कृतीच्या



वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे हे देशातील सर्वात उंच अहिल्यादेवी स्मारक ठरणार आहे. स्मारकाच्या पार्श्वभूमीला ऐतिहासिक महेश्वर किल्ला व इंदूर राजवाडा यांच्या संकल्पनेचा मिलाफ साधणारी २८ फूट उंच व ५६ फूट रुंद दगडी भिंत उभारली जाणार आहे, जी या स्मारकाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

### निधी देण्याची केली घोषणा

या भव्य प्रकल्पासाठी आवश्यक तो वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची हमी ना. पंकजाताई मुंडे यांनी स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी ना. पंकजाताईंचे समितीच्या वतीने जोरदार स्वागत केले. या प्रसंगी खा. कल्याण काळे, आ. नारायण कुचे, आ. बबनराव लोणीकर, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ साहेब, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, स्मारक समितीचे अध्यक्ष कपील दहेकर, सचिव शांतीलाल बनसोडे, संतोष लवटे, अक्षय आटोळे, भगवान माथले, अनिल यशवंते, गणेश वाघमारे, ज्ञानेश्वर भुसारे, शिवराम विर, गोविंद मगदूरे, विजय खटके, बळीराम नेमाने, गजानन आढाव, आकाश हिवाळे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT